# जाहीर लिलाव नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि.,अकोला अंतर्गत सामान्य विभागाच्या परिसरातील एकुण **14** आवळा फडझाडांचा चालू फळ बहराचा जाहीर लिलाव करण्याचे ठरविण्यात आलेले असून सदर जाहीर लिलाव **दिनांक : 24.08.2026 सकाळी 10:30 वाजता** सामान्य विभागाचे प्रांगणात करण्यात येणार आहे.

तरी सर्व इच्छुक व्यापाऱ्यांनी सामान्य विभाग येथे वरील वेळेत बोली बोलण्याकरिता उपस्थित राहावे. लिलावाचे नियम व अटी या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

**संचालक**
**मध्यवर्ती संशोधन केंद्र**
**डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

# जाहीर लिलावाच्या अटी

सामान्य विभागाच्या परिसरातील आवळा चालू फळ बहाराच्या जाहीर लिलाव दिनांक **24.08.2026** रोजी सकाळी ठीक **10:30** वाजता सामान्य विभागावर करण्यात येणार आहे. त्या लिलावाच्या अटी खालील प्रमाणे आहेत.

- सामान्य विभागावरील . आवळा च्या फक्त फळ बहराचा जाहीर लिलावात समावेश आहे.
- ज्यांना लिलावामध्ये भाग घ्यावयाचा असेल त्यांना रुपये 1000 नगदी अनामत रक्कम म्हणून नगदी भरावे लागतील.
- ज्या व्यक्तींनी रुपये 1000 अमानत रक्कम भरली असेल त्यांना फक्त लिलावाच्या वेळी प्रक्षेत्रावरील ठिकाणी हजर राहता येईल. इतर कोणत्याही व्यक्तीस लिलावाच्या वेळी स्थळी थांबता येणार नाही. विभागावरील लिलाव समितीचे सदस्य व कार्यालयीन कर्मचारी लिलावाच्या ठिकाणी राहतील.
- फळ बहराची अपेक्षित किमंत आल्याशिवाय लिलावाच्या बोली मान्य करणे अथवा नाकारणे हे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील.
- बोली बोलणाऱ्या पैकी ज्या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली असेल, त्याला लिलाव समिती मान्यता देईल व याबाबतचा अंतिम निर्णय मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला यांची अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर हि बोली मान्य अथवा अमान्य असल्याचे संबधित व्यापारी/ ठेकेदार यांना सूचित करण्यात येईल.
- लिलावास अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर त्या खरेदीदारास त्या बाबतची सूचना मिळाल्यानंतर लिलावाची 100 % रक्कम त्वरीत भरावी लागेल..
- ठरलेल्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी व ठरलेल्या वेळेवर बोली बोलणारे हजर नसल्यास लिलाव रद्द करण्यात येईल तसेच तीन पेक्षा कमी बोली बोलणारे हजर असल्यास लिलाव रद्द करण्याचा अधिकार लिलाव समितीस राहील.
- झाडावरील फळे तोडताना झाडांना हानी पोहोचणार नाही याची दक्षता ठेकेदारास घ्यावी लागेल. बागेतील झाडाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई ठेकेदाराकडून करण्यात येईल व ह्या बाबतचा अंतिम निर्णय संचालक , मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला यांचे कडे राहील.
- फळे तोडून नेण्याची अंतिम तारीख ................................राहील.
- ठेकेदारास विभागावरील फळ बागेतील रखवाली करिता ठेवणाऱ्या व्यक्तीची माहिती प्रभारी अधिकारी सामान्य विभाग यांना द्यावी लागेल; व त्यांचेकडून त्यांना गेटपास देण्यात येईल. प्रक्षेत्रावर फक्त गेटपास धारकांना प्रवेश राहील.
- झाडांची रखवाली ठेकेदारास स्वतः करावी लागेल राखणदारी करतेवेळी विद्यापीठातील मालमत्तेचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घ्यावी, तसेच नुकसान झाल्यास लिलावाची रक्कम जप्त करून झालेली नुकसान भरपाई ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल.

**संचालक**
**मध्यवर्ती संशोधन केंद्र**
**डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**